तरुण भारत/संवाद 13/8/24



कुंडल : येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या वतीने एक पेड माँ के नाम या अभियानाअंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

## क्रांतिअग्रणी महाविद्यालयाकडून कुंडल येथे वृक्षारोपण

**कुंडल :** येथील क्रांतीअग्रणी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून 'एक पेड माँ के नाम' या अभियानाअंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालय ते घाटगे पुल या रस्त्याच्या दुतर्फा वड, पिंपळ यासह शोभेची झाडे लावण्यात आली. प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांचे मार्गदर्शनाखाली एन.एस.एस. व एन. सी. सी. चे समन्वयक डॉ. सुभाष चवरे, डॉ. धनंजय होनमाने यांचेसह ज्येष्ठ प्रा. डॉ. जगन्नाथ पाटील, झाकिरहुसेन संदे आदीसह सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



कुंडल : क्रांतीअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये वृक्षारोपण करताना राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी.

## क्रांतिअग्रणी महाविद्यालयाकडून कुंडलमध्ये वृक्षारोपण

**कुंडल :** येथील क्रांतीअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या वतीने 'एक पेड माँ के नाम' या अभियानाअंतर्गत वृक्षारोपन करण्यात आले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून वृक्षारोपन करण्यात आले. महाविद्यालय ते घाटगे पुल या रस्त्याच्या दुतर्फा वड, पिंपळ यासह शोभेची झाडे लावण्यात आली. प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांच्या मार्गदर्शनाखाली एन.एस.एस.व एन.सी.सीचे समन्वयक डॉ. सुभाष चवरे, डॉ. धनंजय होनमाने यांच्यासह जेष्ठ प्रा. जगन्नाथ पाटील, झाकिरहुसेन संदे आदी उपस्थित होते.

दै. केसरी 9/08/2024

सोमवार, १२ ऑगस्ट २०२४

# क्रांतिअग्रणी महाविद्यालयात ललकार भित्तीपत्रिकेचे उद्‌घाटन



**कुंडल : ललकार भित्तीपत्रिकेचे उद्‌घाटन करताना किरण लाड यावेळी उपस्थित प्राचार्य डॉ.आर.एस.डुबल यांच्यासह मान्यवर.**

वार्ताहर
कुंडल

येथील क्रांतीअग्रणी डॉ.जी.डी बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय छात्र सेनेच्या संयुक्त विद्यमाने ९ ऑगस्ट क्रांतीदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ललकार भित्तीपत्रिकेचे उद्‌घाटन क्रांती दुध संघाचे चेअरमन किरण लाड यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ.आर.एस. डुबल, डॉ.दत्तात्रय खळदकर, राष्ट्रीय डॉ.धनंजय होनमाने, डॉ.सुभाष चवरे ज्येष्ठ प्रा. डॉ.प्रताप लाड आदीसह सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

यप्रसंगी किरण लाड म्हणाले, स्वातंत्र्य १९४७ ला मिळाले पण ९ ऑगस्ट १९४२ या दिवशी स्वातंत्र्यासाठी सुरु झालेल्या यशस्वी लढ्याची सुरुवात झाली. त्यामुळे या दिवसाला महत्व आहे. इंग्रजांना या देशावर १५० वर्षे राज्य करता आले ते आपल्याच माणसांनी त्यांना साथ केली म्हणून. देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेकांनी बलिदान दिले त्यांचे या दिवशी स्मरण करणे गरजेचे आहे.

# क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचा संघर्ष कांबळे विजेता

दै. तरुणभारत संवाद 27/8/24

वार्ताहर
कुंडल

येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धे मध्ये गारगोटी(जि. कोल्हापूर) च्या संघर्ष भरत कांबळे याने प्रथम क्रमांक मिळवून पंधरा हजार रु. रोख सन्मानचिन्ह व प्रशिस्तीपत्र मिळविले तर ज्युनियर विभागामध्ये श्रेया चंद्रकांत शिंदे हिने बाजी मारली. तिला नऊ हजार रु रोख, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्राने सन्मानित करणेत आले. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेमध्ये जवळपास १२५ स्पर्धक सहभागी झाले होते.

या स्पर्धेचे उद्‌घाटन प्रासिद्ध व्याख्यात्या प्रा. कविता म्हेत्रे यांचे हस्ते व आमदार अरुण(आण्णा) लाड यांचे अध्यक्षतेखाली, स्पर्धेचे स्वागताध्यक्ष, क्रांतीसह, साखर कारखान्याचे चेअरमन शरद लाड यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये झाले.



**कुंडल : विजेत्या स्पर्धकासमवेत सौ. धनश्रीताई लाड, संस्थेचे खजिनदार गोविंदराव डुबल, प्राचार्य डॉ. आर.एस.डुबल, डॉ.प्रताप लाड, डॉ. धनंजय होनमाने व मान्यवर.**

या स्पर्धेसाठी स्वातंत्र्य योद्धांनो तुम्ही पुन्हा जन्माला या, प्रज्ञावंतांचे राष्ट्रपती उत्तरदायित्व, खरच ! सोन पांघरुन चिंध्या विकणाऱ्यांची संख्या वाढतेय..., रंग, धर्माचे राजकारण आणि राजकारणाचा धर्म, संत कबिर: भारताचा सामाजिक नायक, आदर्श आणि तरुणाई असे विषय होते. ही स्पर्धा पदवी, पदव्युत्तर व ज्युनियर या दोन विभागात झाली. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. डॉ. अनिल गवळी, प्रा.डॉ.पंकज पवार, ॲड. अर्चना चव्हाण यांनी काम पाहिले.

या स्पर्धेमध्ये सिनियर विभागामध्ये द्वितीय क्र. ऋतुजा माने( इ.पूर), तृतीय सुभाषित पाटील(खंडेराजुरी), चतुर्थ रोहन चव्हाण(बिड) पाचवा क्रमांक, चारुदत्त माळी(बिड) याने मिळविला तर उत्तेजनार्थ म्हणून दिव्या केळकर व तेजस पाटील यांनी बाजी मारली. ज्युनियर विभागामध्ये राधानगरीच्या ऋतुजा सतिश पवार हिने द्वितीय, सांगलीच्या शांभवी माळकर याने तृतीय तर चतुर्थ क्रमांक तेजस्वी माने हिने, पाचवा क्रमांक सानिका कदम तर श्रावणी वैभव संकपाळ, ज्ञानेश्वरी शिंदे यांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. या स्पर्धेचे संयोजन शरद लाड यांचे नेतृत्वाखाली प्राचार्य डॉ.आर.एस. डुबल, प्रा.डॉ.प्रताप लाड, प्रा.डॉ. धनंजय होनमाने, डॉ.प्रविणकुमार लुपणे आदींनी केले.